प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मधील भरतीबाबत प्राथम्यक्रम.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जानेवारी १९८०.

संदर्भ :- (१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-१०७१/१७७७८५/र-१, दिनांक २० नोव्हेंबर १९७३.

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७८/आरएपी/१२, दिनांक २२ सप्टेंबर १९७८.

निर्णय :- शासनाच्या पुनर्वसनविषयक धोरणानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना शासकीय सेवा प्रवेशासाठी तारतम्य दाखवून नोकरीत पसंती देण्याबाबत सवलत देण्यात आली आहे. त्यानुसार अशा व्यक्तींनी त्यांची नावे सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदविलेली असतील आणि संबंधित शासकीय पदाबाबत असलेल्या भरतीच्या शर्ती पूर्ण केल्या असतील तर, शासकीय कार्यालया-मधील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेर असलेल्या पदांवर नेमणूक करण्यासाठी त्यांना तारतम्याने पसंती देण्यात येते. शासन ठराव, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-१०७१/१७७७८५/र-१, दिनांक २० नोव्हेंबर १९७३ मधील आदेशानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्तींना पाटबंधारे प्रकल्पाच्या आस्थापनेवर भरती-साठी 'सर्वोच्च प्राथम्यक्रम' (Highest priority ) देण्यात येतो. त्यासाठी सेवायोजन कार्यालयात नावे नोंदविण्याची अट त्यांच्याबाबतीत लागू करण्यात येत नाही. शासन ठराव, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७८/आरएपी/१२, दिनांक २२ सप्टेंबर १९७८ द्वारा काढलेल्या आदेशाप्रमाणे बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयांतील पदांत भरतीबाबत ज्या प्रकल्पग्रस्तांची घरे किंवा ७५ टक्के शेत-जमीन प्रकल्पासाठी संपादण्यात येते त्यांच्या बाबतीत शासकीय सेवा भरतीसाठी असलेली कमाल वयोमर्यादा ३ वर्षांनी शिथील करण्यात आली आहे. तसेच अशा प्रकल्पग्रस्तांची शासनामध्ये अस्थायी स्वरूपाची सेवा केली असेल तर, त्या अस्थायी सेवेचा कालावधी शासन प्रवेशासाठी असणारी कमाल वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी लक्षात घेण्यात येतो आणि सदर कमाल वयोमर्यादा अस्थायी सेवेच्या कालावधीने शिथिल करण्यात येते. प्रकल्पग्रस्तांना शासनाच्या सेवेत पुन्हा प्रवेश मिळाल्यावर त्यांच्या पूर्वीच्या अस्थायी सेवेचा कालावधी त्यांच्या शासन सेवेचा एकूण कालावधी निर्धारित करण्यासाठी ग्राह्य धरण्यात येतो व शासना-मधील त्यांची सर्व सेवा अखंड असल्याचे मानण्यात येते.

२. प्रकल्पग्रस्तांना शासन सेवा प्रवेशासाठी दिलेल्या वरील सवलती व्यवहारामध्ये विशेष परिणामकारक होत नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. पाटबंधारे प्रकल्पांच्या आस्थापनेवर दिलेल्या सर्वोच्च प्राथम्याखेरीज प्रकल्पग्रस्तांना इतर शासकीय कार्यालयांमध्ये सेवा प्रवेशासाठी प्राथम्यक्रम देण्यात आलेला नाही. परिणामतः शासकीय नोकरीसाठी प्रकल्पग्रस्तांना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना तारतम्यपूर्वक दिलेल्या पसंतीच्या सवलतींचा फारसा उपयोग होत नाही. यामुळे शासकीय सेवा प्रवेशासाठी सर्वोच्च प्राथम्य-क्रम मिळावा अशी मागणी प्रकल्पग्रस्तांकडून बऱ्याच काळापासून करण्यात येत आहे. राज्याच्या विकासाकरिता शासनाने हाती घेतलेल्या विविध प्रकल्पांमुळे प्रकल्पग्रस्तांना स्थलांतर करावे लागते आणि इतरत्र नवीन जीवनक्रम सुरु करावा लागतो आणि त्या अनुषंगाने अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवून त्यांना शासनाने दिलेली नोकरीविषयक सवलत प्रत्यक्षात परिणामकारक व फलदायी ठरावी आणि पुनर्वसनाच्या कार्यवाहीमध्ये त्यांना सहाय्य व्हावे म्हणून त्यांना शासकीय सेवा प्रवेशासाठी

निश्चित प्राधान्यक्रम देणे आवश्यक आहे असे शासनाला वाटते. यासाठी शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :—

अ) शासनाने हाती घेतलेल्या पाटबंधारे प्रकल्पासह सर्व प्रकल्पांच्या बाबतीत, त्या प्रकल्पांना महाराष्ट्र प्रकल्प विस्थापितांचे पुनर्वसन कायदा, १९७६ लागू केला आहे किंवा नाही हे लक्षात न घेता, त्यांच्या आस्थापनेवरील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील पदांवर नेमणूक करण्यासाठी प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना 'सर्वोच्च प्राधान्यक्रम' देण्यात यावा. यासाठी सेवायोजन कार्यालय किंवा राज्य निवड मंडळ यांच्याकडे संदर्भ करण्याची आवश्यकता नाही. मात्र या सवलतीची अंमलबजावणी करताना प्रकल्पग्रस्त कुटुंबातील फक्त एका व्यक्तीस तिचा फायदा मिळावा. या संदर्भात खालील परिच्छेद (५) मधील तरतूदही लक्षात घेण्यात यावी. हा आदेश निघण्यापूर्वी ज्या प्रकल्पग्रस्त व्यक्तींना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना पाटबंधारे प्रकल्प आस्थापनेवर तसेच इतरही प्रकल्प आस्थापनेवर नोकरी देण्यात आली असेल, त्यांच्या कुटुंबात उपरोक्त प्रकल्प आस्थापनेवर नोकरी मिळालेल्या व्यक्तींची संख्या लक्षात न घेता, ते नेमणुकीच्या वेळी राज्य निवड मंडळामार्फत नेमले गेले नसले तरी, त्यांना या आदेशांचा फायदा देण्यात यावा.

ब) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७९/६६/१६-अ, दिनांक २७ एप्रिल १९७९ द्वारा शासन सेवा, शासन पुरस्कृत महामंडळे, शासनाकडून मदत करण्यात येणारी महामंडळे, शासनाने चालविलेल्या संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाकडे आहे अशा इतर सर्व ऑथोरिटीज, सेवा व संस्था यांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील व्यक्तींसाठी शासनाने आधीच राखून ठेवलेल्या ८० टक्के जागा भरताना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकात मोडणाऱ्या प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना "सर्वोच्च प्राधान्यक्रम" देण्यात यावा. मागासवर्गीयांच्या विविध घटक वर्गासाठी राखून ठेवलेल्या ३४ टक्के जागा भरून झाल्यावर हा प्राधान्यक्रम अंमलात यावा आणि हा सर्वोच्च प्राधान्यक्रम एकूण जागांच्या किमान ५ टक्के पर्यंत देण्यात यावा. एखादी प्रकल्पग्रस्त व्यक्ती अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ वा इतर मागासवर्गीय गटात मोडत असेल तर, त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या उपरोक्त ३४ टक्के जागा भरताना ती प्रकल्पग्रस्त व्यक्ती वरीलपैकी ज्या विशिष्ट गटात मोडत असेल त्या विशिष्ट गटासाठी राखून ठेवलेल्या जागेनुसार तिला सर्वोच्च प्राधान्यक्रम देण्यात यावा. प्रकल्पग्रस्त व्यक्ती वरील कोणत्याही गटात मोडत नसेल परंतु, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकात मोडत असेल तर, तिला ८० टक्के जागांमधील (३४ टक्के जागा वगळता) उरलेल्या जागा भरताना "सर्वोच्च प्राधान्यक्रम" देण्यात यावा.

क) उपरोक्त नोकरीविषयक सवलतीच्या संदर्भात "केंद्र शासन किंवा राज्य शासन यांनी हाती घेतलेल्या पाटबंधारे, वीज अथवा इतर कोणत्याही प्रकल्पामुळे ज्या व्यक्तीचे घर आणि/अथवा जमीन पूर्णतः किंवा अंशतः संपादण्यात आली असेल" अशा व्यक्तींना "प्रकल्पग्रस्त व्यक्ती" मानण्यात यावे. या संदर्भात त्या व्यक्तीचे घर आणि/अथवा जमीन पूर्णतः किंवा अंशतः ज्या प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली असेल तो प्रकल्प" महाराष्ट्र प्रकल्प विस्थापितांचे पुनर्वसन कायदा, १९७६" खाली अधिसूचित झाला आहे किंवा नाही हे लक्षात घेण्याची आवश्यकता नाही. तसेच नोकरीविषयक संदर्भात प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्ती व अशा प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती म्हणून प्रकल्पग्रस्त व्यक्तीचा पती अथवा अशा व्यक्तीची पत्नी, अशा व्यक्तीचे अज्ञान मुलगे, अशा व्यक्तींच्या अविवाहित मुली, अशा व्यक्तीचे अज्ञान भाऊ किंवा बहिणी, तसेच अशा व्यक्तीचे आई व वडील या व्यक्तींचा समावेश गाह्य धरावा. या निर्णयानुसार शासन पत्र, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-१०७४/३५००/र-१, दिनांक २० मार्च १९७५ मध्ये दिलेल्या 'प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती' या संज्ञेच्या व्याख्येत

आवश्यक बदल करण्यात यावा.

५) संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वतीने संबंधित पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेल्या दाखल्याच्या आधारे एखादी व्यक्ती 'प्रकल्पग्रस्त व्यक्ती' किंवा 'प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणारी व्यक्ती' आहे असे ठरविण्यात यावे. प्रस्तुत दाखल्याचा नमुना सोबत जोडला आहे. हा दाखला फक्त प्रकल्पग्रस्त व्यक्तीला देण्यात यावा आणि त्याचा उपयोग त्याच्या कुटुंबातील फक्त एकाच व्यक्तीस करता यावा. या संदर्भात खालील परिच्छेद (६) मधील तरतूदही लक्षात घेण्यात यावी. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला वरीलप्रमाणे नोकरी मिळाल्यानंतर सदर दाखल्याची नोकरीविषयक परिणामकारकता रद्द करण्यात यावी. तथापि सदर दाखलाधारक व्यक्तीला पुनर्वसन योजनेखालील इतर विविध सवलतींच्या बाबतीत अशा दाखल्याची आवश्यकता असल्यास, तो दाखला वापरण्याची मुभा देण्यात यावी. प्रकल्पग्रस्त व्यक्तीला किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला सदर दाखल्याच्या आधारे नोकरी दिल्यानंतर नोकरी दिल्याबाबतची माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे तसेच संबंधित जिल्ह्याच्या सेवायोजन कार्यालयाकडे पाठविण्याबाबत सर्व शासकीय कार्यालयांना आदेश देण्यात यावेत.

६) ज्या प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही १ जून १९६५ पूर्वी सुरु करण्यात आली, त्यामुळे ज्या व्यक्ती प्रकल्पग्रस्त झाल्या, अशा प्रकल्पग्रस्त व्यक्तींच्या कुटुंबातील जास्तीत जास्त दोन व्यक्तींना वरील 'सर्वोच्च प्राधान्यक्रमा' चा लाभ देण्यात यावा.

३. वरील आदेश महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेर असलेल्या पदांवरील भरतीसाठी लागू आहेत.

४. हे आदेश महसूल व वन विभागाच्या संमतीने काढण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

अ. ना. बटव्याल,
शासनाचे सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उप संचालक (जमीन),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा पुनर्वसन उप संचालक (विकास),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
सर्व अधीक्षक अभियंते, पाटबंधारे व वीज (जलविद्युत) प्रकल्प,
सर्व कार्यकारी अभियंते, पाटबंधारे व वीज (जलविद्युत) प्रकल्प,
सचिव, राज्य निवड मंडळ, औरंगाबाद,
महसूल व वन विभाग, सर्व कार्यासन अधिकारी,
पाटबंधारे विभाग (५ प्रतींसह),
वित्त विभाग (५ प्रतींसह),
सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन क्रमांक १२, १३-अ, १६-ब, १९, २०, २१),
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पुनर्वसन संचालनालय,
निवडक नस्ती.

एच-१२७०(२०००-२-८०)२.

**प्रपत्र**

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१ जानेवारी १९८० चे सहपत्र)

---

**प्रकल्पग्रस्त व्यक्तीला अथवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला नोकरीविषय सवलतीच्या संदर्भात द्यावयाच्या दाखल्याचा नमुना**

जिल्हाधिकारी कार्यालय (पुनर्वसन शाखा),
-------------------- प्रकल्प,
-------------------- जिल्हा

दिनांक :

१) दाखला देण्यात येतो की, श्री./श्रीमती/कुमारी -------------------- (प्रकल्पग्रस्त व्यक्तीचे संपूर्ण नाव) ------ यांचे --------------- (गावाचे नाव) ----------- (तालुक्याचे नाव) ------------ (जिल्ह्याचे नाव) ------- येथील सर्व्हे क्रमांक --------- मधील ----- (हेक्टर आर ) शेतजमीन ------------ (प्रकल्पाचे नाव) ------------ प्रकल्पासाठी संपादन केली असल्यामुळे/करण्यात येत असल्यामुळे ते/त्या/ती प्रकल्पग्रस्त व्यक्ती आहे/आहेत.
आणि/अथवा

२) दाखला देण्यात येतो की, श्री./श्रीमती/कुमारी ------------------ (प्रकल्पग्रस्त व्यक्तीचे संपूर्ण नाव) ------------- यांचे ------------------ (गावाचे नाव) ----------- (तालुक्याचे नाव) -------------- (जिल्ह्याचे नाव) ----------- येथील घर/घरे ----- ---------- (प्रकल्पाचे नाव) ------------- प्रकल्पासाठी संपादन केली असल्यामुळे/करण्यात येत असल्यामुळे ते/त्या/ती प्रकल्पग्रस्त व्यक्ती आहे/आहेत.

३) दाखला देण्यात येतो की, श्री./श्रीमती/कुमारी ------------ (हे/ह्या/ही उपरोक्त परिच्छेद १/२) मधील प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील आणि त्याच्यावर अवलंबून असणारी व्यक्ती असून त्यांचे प्रकल्पग्रस्त व्यक्तीशी नाते पती/पत्नी/अज्ञान मुलगा/अविवाहीत मुलगी/अज्ञान भाऊ/अज्ञान बहिण/आई/वडिल असे आहे.

४) शासनाच्या पुनर्वसन योजनेअंतर्गत सदर प्रकल्पग्रस्त व्यक्तीला किंवा त्याच्या कुटुंबातील आणि त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या उपरोक्त एकाच व्यक्तीला नोकरी मिळण्याच्या संदर्भात सदर दाखला परिणामकारक राहील. ज्या प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही दिनांक १ जून १९८५ पूर्वी सुरु करण्यात आली असल्यामुळे ज्या व्यक्ती प्रकल्पग्रस्त झाल्या अशा प्रत्येक प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील जास्तीत जास्त दोन व्यक्तींना शासकीय कार्यालयात नियमानुसार नोकरी मिळेपर्यंत सदर दाखला परिणामकारक राहील. वरीलप्रमाणे संबंधित व्यक्तीला नोकरी मिळाल्यावर या दाखल्याची परिणामकारकता रद्द होईल.

५) ह्या दाखल्याच्या आधारे प्रकल्पग्रस्त व्यक्ती किंवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला/जास्तीत जास्त दोन व्यक्तींना/नोकरी देण्याची कार्यवाही करणाऱ्या कार्यालयाने नोकरी दिल्याबाबत तपशील खालील जिल्हाधिकाऱ्यांकडे/पुनर्वसन अधिकाऱ्यांकडे तात्काळ कळविणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी ---------------
जिल्ह्याचे नाव ---------------
जिल्हा पुनर्वसन अधिकारी
जिल्हाधिकारी ---- (जिल्ह्याचे नाव)----
यांचेकरिता

टीप.– वरील दाखल्याच्या परिच्छेद १) व २) मध्ये नमूद केलेल्या शेतजमिनीबाबत किंवा/आणि घरांबाबत भूसंपादन कायद्याच्या कलम ४ अनुसार काढण्यात आलेली अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात ज्या तारखेस प्रसिद्ध केली जाईल, त्या तारखेपासून सदर दाखला परिणामकारी होईल.